# मुंबई विद्यापीठ

क.वि.क./आयसीसी/२०२४–२५/०३
दिनांक – २४ जुलै,२०२४

परिपत्रक :–

विद्यापीठातील विविध पदव्युत्तर विभागाचे/संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित, मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व संस्था प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांच्या क्र. उशिसं शिष्यवृत्ती/व्या.अ.प्र.मु./२०२४, दिनांक २३ जुलै, २०२४ अन्वये श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचा विद्यार्थी पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवादाबाबत शासन परिपत्रक निर्गमीत केलेले आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

शासन निर्णय दि. ०७ ऑक्टोबर, २०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतन/सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणा–या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रू ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुला–मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कात १०० टक्के लाभ देण्यात येतो असे सोबत जोडलेल्या परिपत्रकामध्ये विहित करण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने राबविण्यात येणा–या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती देण्याकरीता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य हे दि. २५ जुलै, २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० दरम्यान Webinar च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.

तरी या कार्यक्रमाचे Live प्रक्षेपण आपापल्या संस्थामध्ये मोठया पडद्यावर (Screen वर) सर्व विद्यार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल अशा पध्दतीची व्यवस्था करण्यात यावी व याकरीता आपापल्या संस्थेतील/विद्यापीठातील/महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व पालक यांना सदर कार्यक्रमास संस्थेत उपस्थित राहणे बाबत सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्या.

या कार्यक्रमासाठी Webinar ची लिंक खालीलप्रमाणे आहे.

http://www.parthlive.com

सदर परिपत्रक आणि शासन निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.mu.ac.in) उपलब्ध आहे.

Baliram

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

२/–

Scanned with OKEN Scanner

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी —

विद्यापीठातील विविध पदव्युत्तर विभागाचे/संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित, मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालयें व संस्था प्राचार्य/संचालक.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

प्रत माहितीसाठी :—

१. मा. संचालक, महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे — ४११००१.

२. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय सहसंचालक कार्यालय, एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३,महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.

३. मा. सहसचांलक, (उच्च शिक्षण) कोकण विभाग, पनवेल, शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जिल्हा— रायगड ४१० २०६.

४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, मुंबई विद्यापीठ, महात्मा फुले भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई — ४०० ०९८.

५. मा. वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -020/29707098/26126939 फॅक्स 020/26111153


क्र.उशिंसं शिष्यवृत्ती/ व्या.अ.प्र.मु./2024 दिनांक-

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय - श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचा विद्यार्थी पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद.**

संदर्भ - 1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र 332/तांशि-4,दि.7.10.2017
2. शासन निर्णय क्र. शिष्यवृ-2024/प्र.क्र105/तांशि-4,दि.8जुलै,2024

शासन निर्णय दि. 07.10.2017 नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे, शासकिय अभिमत विद्यापीठे(खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कात 100 टक्के लाभ देण्यात येतो.

आता शासन निर्णय क्र.2 नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे,शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठ /स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे(Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून)प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामायिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन ऐवजी 100 टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क यामध्ये 100 टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पर्वीपासून प्रवेशि असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या),महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दि.06.04.2023 मध्ये नमुद केलेला"संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टिने राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरीता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत **श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. 25.जुलै 2024 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 दरम्यान Webinar च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.**

तरी, या कार्यक्रमाचे LIVE प्रक्षेपण आपापल्या संस्थामध्ये मोठ्या पडद्यावर (Screen वर) सर्व विद्यार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल अशा पध्दतीची व्यवस्था करण्यात यावी व याकरीता आपापल्या संस्थेतील/ विद्यापीठ / महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व पालक यांना सदर कार्यक्रमास संस्थेत उपस्थित राहणे बाबत सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्या.

या कार्यक्रमासाठी Webinar ची लिंक खालीलप्रमाणे आहे.

**http://www.parthlive.com**

प्रत माहितीकरीता-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता-

सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालये, यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी आपापल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विद्यापीठे,संस्था, महाविद्यालये यांना अवगत करावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 23-07-2024 11:54:27

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-1

Scanned with OKEN Scanner